# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 15 January 2025

# Time 01.00 to 01.05 PM

# Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १५ जानेवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज मुंबईत नौदलातल्या आयएनएस सूरत, आयएनएस नीलगिरी आणि आयएनएस वागशीर या तीन लढाऊ जहाजांचं जलावतरण झालं. केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह,राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह नौदलातले अधिकारी आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते. इंडो पॅसिफिक क्षेत्रात भारतीय नौदलाची मजबूत उपस्थिती आवश्यक असल्याचं मत यावेळी केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केलं.या युद्धनौकांची पंचाहत्तर टक्के बांधणी स्वदेशात झाल्याबद्दल संरक्षणमंत्र्यांनी समाधान व्यक्त केलं.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी बोलताना,भारत जगातली प्रमुख सागरी शक्ती बनत असल्याचं सांगत भारताची भूमिका विस्तारवादाची नव्हे तर विकासवादाची असल्याचं सांगितलं.

छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतात नौदलाची सुरुवात केली,त्या शिवरायांच्या भूमीवरून नौदलाला सामर्थ्य दिलं जात असल्याचं समाधान वाटत असल्याची भावना पंतप्रधानांनी यावेळी व्यक्त केली.भारताच्या संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या प्रत्येक सैनिकाचं अभिनंदन पंतप्रधानांनी यावेळी केलं.

आपलं सरकार नौदलासह पूर्ण सैन्यदलाला आत्मनिर्भर बनवत अधिक मजबूत करण्याला प्राधान्य देत असल्याचं सांगत, यात महाराष्ट्रातल्या नियोजित वाढण बंदराचा उल्लेख पंतप्रधानांनी केला.ते म्हणाले...

***हमारे तिसरे टर्म के पहले बडे फैसलों में से था, महाराष्ट्र के वाढवण पोर्ट को मंजुरी। पचहत्तर हजार करोड रुपयो के खर्च से इस आधुनिक पोर्ट के निर्माण का काम शुरु भी हो चुका हैं। इससे भी महाराष्ट्र में रोजगार के हजारो नये अवसर बनने वाले हैं।***

****

आज सत्त्याहत्तरावा भारतीय लष्कर दिन साजरा केला जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या दिनानिमित्त लष्कराला शुभेच्छा दिल्या असून, लष्कराच्या अमूल्य त्यागाबद्दल देश लष्कराचा कृतज्ञ आहे, अशी भावना व्यक्त केली आहे. भारतीय लष्कर हे निर्धार,व्यावसायिकता आणि समर्पणाचं प्रतीक आहे, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लष्कराचा गौरव केला आहे.आपल्या सीमांचं रक्षण करण्यासोबतच भारतीय लष्करानं नैसर्गिक संकटांच्या काळात नागरिकांना मदत करत अत्यंत मोलाची भूमिका बजावली आहे, असं सांगत,भारतीय लष्करातल्या कर्मचाऱ्याचं आणि त्यांच्या कुटुंबांचं कल्याण, यासाठी आपलं सरकार प्रतिबद्ध आहे, असं पंतप्रधानांनी आपल्या याबाबतच्या संदेशात म्हटलं आहे. सीडीएस जनरल अनिल चौहान यांनीही सैन्याला या दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.हा दिवस भारतीय सेनेच्या समर्पण आणि साहसाचं प्रतिक आहे, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

'राष्ट्ररक्षा' हेच सर्वोच्च ध्येय मानून, आपले सर्वस्व त्यागून लढणाऱ्या भारतीय सैनिकांच्या शौर्याला आणि त्यांच्या कुटुंबांच्या समर्पणाला वंदन, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

****

संतोष देशमुख हत्या प्रकरणांमध्ये कटकारस्थान रचण्याच्या आरोपाखाली वाल्मीक कराड याच्यावर संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा अर्थात मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर बीड जिल्ह्यातल्या परळी शहरात तणावपूर्ण शांतता असल्याचं वृत्त आहे. परळी शहरात पोलिसांनी ठिकठिकाणी बंदोबस्त तैनात केला असून बाजारपेठ बंद आहे.वाल्मिक कराड याला आज केज इथल्या न्यायालयात हजर केलं जाणार असल्यामुळे केज न्यायालय परिसरामध्येही मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे.दरम्यान, परळीतील व्यापाऱ्यांनी वाल्मीक कराडच्या समर्थनार्थ आजपासून बेमुदत संप पुकारला असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

भारत दूध उत्पादनात जगात पहिल्या स्थानावर तर अंडी उत्पादनात दुसऱ्या स्थानावर आला आहे. पशुसंवर्धन विभागाच्या योगदानामुळे पशुधन क्षेत्रातील प्रगती आणि आर्थिक विकास साध्य झाल्याचं केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह यांनी म्हटलं आहे.

****

नायलॉन मांजामुळे  एका दुचाकी चालकाचा गळा कापला गेल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना काल अकोला शहरात घडली.उतारावरून दुचाकी जात असताना गळ्याभोवती नायलॉन मांजा गुंडाळला गेल्यानं ही दुर्घटना घडल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.
नाशिकमध्येही संक्रांतीच्या पतंगोत्सवात नॉयलॉन मांजामुळे गळा कापला गेल्यानं एका युवकाचा बळी गेल्याचं वृत्त आहे. दरम्यान घातक मांजाच्या वापरावर बंदी घालण्यात आली असून पोलीस आणि प्रशासनानं राज्यात अनेक ठिकाणी कारवाई करुन नायलॉन मांजाचे साठे जप्त केले आहेत.

****

चंदीगड इथे नुकत्याच पार पडलेल्या पंजाब विद्यापीठाच्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ नेमबाजी स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठानं सुवर्णपदक पटकावलं आहे.५० मीटर ३ पोझिशन रायफल नेमबाजीत पुरुष गटात रुद्रांक्ष पाटील यानं आपल्या उत्कृष्ट नेमबाजीच्या जोरावर ६०० पैकी ५९३ गुण मिळवत हे सुवर्णपदक मिळवलं.

****